# लैंगिक शिक्षणाला पर्याय

विद्यार्थ्यांची लक्षणे सांगणारा संस्कृतमध्ये एक श्लोक आहे.

काकचेष्टा बकोध्यानं
क्ष्वाननिद्रा तथैवच।
अल्पाहारी ब्रह्मचारी
विद्यार्थिन: पत्र्वलक्षणम्।।

विद्यार्थ्यांच्या या लक्षणात ब्रह्मचारी म्हणजे विद्यार्थी असं म्हटलं आहे. अहो आज सेक्सनं नुसता धुमाकूळ घातला आहे. ब्रह्मचर्याचं महत्व तुम्हाला कळलयं का? असा प्रश्न सुद्धा विद्यार्थ्यांना विचारतांना मीच गुन्हेगार असल्यासारखं मला वाटतंय. पण कुठेतरी, कुणीतरी तर या प्रश्नाला व प्रश्नाच्या उत्तराला वाचा फोडण्याची गरज आहे. म्हटलं चला, आपणच ठरु या गुन्हेगार.

विद्यार्थ्यांना विचारलं ब्रह्मचर्य म्हणजे काय? वर्गात चिडीचूप्प शांतता. जणू आपण त्या गावचेच नाही. त्यांच्या मनात प्रश्न होता, इतकं वादंग आहे सेक्स एज्युकेशन शाळांमधून सुरु करायचं की नाही, अन् आमच्या टिचर विचारतात, 'तुम्ही ब्रह्मचर्य पाळता का ? अहो, किती हा विरोधाभास! इ. इ.

त्यांच्या मनातील अनेक प्रश्न जे विद्यार्थ्यांनी कधीही विचारले नाहीत व कधी विचारणारच नाही ते मी ओळखले. 'अहो मॅडम काय तुम्ही? कशाला हवयं ब्रह्मचर्य? आज चौथीतले विद्यार्थी अकाली तरुण होतात आणि I Love you ची चिठ्ठी मुलींना पाठवतात, हायस्कूल पर्यंत याचा अर्थ विद्यार्थ्यांना कळायला लागतो आणि तिथेच त्यांची कुचंबणा सुरु होते. विद्यार्थी मनातल्या मनात स्वीकारतात, 'प्रेम करण्याचं हे वय नाही पण काय करु मन मानतच नाही'. अन् ते विद्यार्थी कुप्रवृत्तीचे ठरु लागतात. जेव्हा या विद्यार्थ्यांमध्ये आम्ही वावरतो तेव्हा प्रकर्षानं जाणवतं, आज या विद्यार्थ्यांना लैंगिक शिक्षण देण्याचीच गरज नाही, तर **विद्यार्थ्यांना या लैंगिक भावनांना आवर कसा घालता येईल, हे शिक्षण देण्याची गरज आहे.**

एक उदाहरण देते, एक आठवीतली विद्यार्थीनी शाळेला दांडी मारुन एका

कॉलेज तरुणाबरोबर फिरताना पकडली गेली. तिच्या वडिलांनी तिला बदड-बदड बदडलं. असं वाटलं तिच्या वडिलांनी जर या मुलीला नियमित खेळायला पाठवलं असतं तर बरीचशी तिची उर्जा मैदानावर खर्च झाली असती व ती मार खाण्यापासून बचावली असती. पण आजच्या शिकवण्यांच्या जमान्यात तिला मैदानावर खेळायला पाठवा असे म्हणून पुन्हा मीच गुन्हेगार ठरले असते.

सरकारने खेळाचं महत्व ओळखलं होतं म्हणून खूप शारीरिक शिक्षक तयार झाले, पण आज शारीरिक शिक्षकांना योग्य न्याय न मिळाल्यामुळे विद्यार्थी पुन्हा पठडीतल्या शिक्षकांकडेच शिकवण्यांना जाऊ लागल्यामुळे लैंगिक उर्जेचा प्रश्न अनुत्तरितच राहिला. विद्यार्थ्यांना या वयात ठामपणे माहित असते की लैंगिक विचार देखील माझ्या अभ्यासात अडथळा ठरतात. पण विचारांना मनातून पार करण्यासाठी विद्यार्थ्यांना श्वासावर लक्ष केंद्रित करायला सांगितलं तर याच विद्यार्थ्यांच्या घरुन विरोध होतो. 'अभ्यास सोडून हे काय भलतंच करायला सांगता? त्यापेक्षा रविवारी एक्सट्रा क्लास घ्या, नक्की पाठवू. ध्यानाचा वर्ग घेणार असाल तर, विद्यार्थ्यांना एक दिवस तरी सुट्टी द्या', म्हणून पालक शिक्षकांनाच रागावतात.

**तेव्हा लैंगिक विचारांना आवर घालायचा असेल तर ध्यानच करावं लागेल व लैंगिक उर्जेला वाट करुन द्यायची असेल तर मैदानावर खेळावंच लागेल,** हे अगदी आवर्जून सांगावंस वाटतं. यशाचा मार्ग खडतरच असतो तो चालावाच लागेल.

तेव्हा खेळाला तसेच ध्यानाला, लैंगिक शिक्षणाचा पर्याय म्हणता येईल. बरीचशी लैंगिक उर्जा व्यक्तिमत्व घडविण्यासाठी वापरता येईल व विद्यार्थिनीसाठी व्यायाम, कला, शरीराला प्राप्त होणारी डौल, निर्भयता, आत्मविश्वास अशा किती तरी गोष्ट साध्य होतील अन् लैंगिक प्रवृत्तीकडे झुकणारा तोल सावरला जाईल.

लैंगिकता ही खरं म्हणजे प्रजोत्पादनासाठीच वापरली जावी पण ती आज करमणुकीचं साधन ठरली व अत्यंत खालच्या दर्जाचा आनंद मिळविण्याकडे

तारुण्य झुकलंय व त्याची फार मोठी किंमत हेच तरुण, नव्हे शालेय विद्यार्थी सुद्धा अभ्यासापासून, सद्‌प्रवृत्ती पासून दूर जाऊन चुकवतात.

तेव्हा गरज आहे ती लैंगिक भावनांना वेळीच आवर घालण्याची, लैंगिक शिक्षणाची नव्हे. लैंगिक शिक्षणाने कुतूहल चाळवून जर काही वेडवाकडं याच तरुणांच्या व अकाली तारुण्याच्या उंबरठयावर उभ्या असलेल्या शालेय विद्यार्थ्यांच्या हातून घडलं तर सगळयात जास्त जबाबदारी समाजाची व समाजाचे घटक असणाऱ्या पालकांची नाही का ? फक्त विद्यार्थ्यांना मार देऊन हा प्रश्न सुटणारा नाही.  त्यावर उपाय आहे. तो करावा लागेल. विद्यार्थ्यांबरोबर जर पालक व शिक्षकही ध्यान करायला शिकले, जे त्यांच्या आयुष्यात करायला त्यांना कोणी भाग पाडलं नाही, तरच ही समस्या लवकर सुटेल, अन्यथा चिघळेलच.

सकाळ – ४ नोव्हेंबर २००९